
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का. वा
दा. क्र. ३५५६

IRBK-0103667
IRBK-0103667



# विवेकानंदांच्या बोधकथा

: अनुवादक :

विनायक सदाशिव सुखठणकर

१९५१

★

किंमत ८ आणे

IRBK-0103667

ग्रंथालय

१९७०

बॉम्बे बुक डेपो, मुंबई ४. दादर बुक डेपो, मुंबई १४.

म. प्रे. मं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ३६६० नों. दि ............
वि. ९१-९१ ........ क्र. ................

स्वामी विवेकानंदांच्या ग्रंथांमध्यें एखादें तत्त्व विशद करण्याकरतां त्यांनीं सांगितलेल्या दृष्टांतपर गोष्टी ठिकठिकाणीं विखुरलेल्या आढळतात. त्यांतील मुलांना—किशोरवर्गाला वाचनीय अशा सहा गोष्टी निवडून त्यांचा अनुवाद या पुस्तकांत दिला आहे. अनुवाद करतांना मुलांच्या दृष्टीनें योग्य असा संक्षेप व इतर फेरफार या गोष्टींमध्यें केले आहेत.

हें पुस्तक मुलांकरितां लिहिलें असलें, तरी बऱ्याच प्रौढ वाचकांच्या, विशेषतः साक्षरताप्रसारसंस्थांच्या बाबतींतही हें उपयुक्त ठरेल.

**विनायक सदाशिव सुखठणकर**

आवृत्ति दुसरी

( सर्व हक्क लेखकाधीन )

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| | स्वामी विवेकानंद .... .... | ३ |
| १ | गोपाळाची गोष्ट .... .... | ७ |
| २ | खरी ईश्वरभक्ति .... .... | १६ |
| ३ | परमेश्वरस्वरूप कोणाला कळेल? .... | १९ |
| ४ | आत्मविकासाची कसोटी .... .... | २२ |
| ५ | खरा यज्ञ .... .... | २७ |

५५५२० वि ... नोंद दि. ...

# स्वामी विवेकानंद

१८९३ सालीं अमेरिकेंत शिकागो या शहरीं सर्वधर्मपरिषद् भरली होती. दूरदूरच्या देशांतून आलेल्या जगांतील १ अब्ज २० कोटी लोकसमुदायाच्या प्रतिनिधींनीं—आपापल्या धर्मशास्त्रांत पारंगत, ज्ञानसंपन्न अशा धर्माचार्यांनीं या परिषदेंत भाग घेतला होता. अमेरिकेंतील व इतर पाश्चात्य राष्ट्रांतील सहा सात हजारांचा निवडक विद्वज्जनसमूह श्रोतृवर्गाच्या रूपानें या ज्ञानसत्राला हजर होता. ही परिषद् म्हणजे अखिल मानवजातीचें ज्ञान व संस्कृती यांचें एक अभूतपूर्व असें संमेलनच होतें! जगाच्या इतिहासांतील एक अत्यंत संस्मरणीय असा हा प्रसंग होता!

परिषदेचें उद्घाटन होतांच पहिल्या दिवशीं क्रमाक्रमानें निरनिराळ्या धर्मांतील प्रतिनिधींचीं वक्तृत्वपूर्ण अशीं भाषणें झाल्यावर अखेरीस अध्यक्षांच्या सूचनेवरून शेवटचा प्रतिनिधी व्यासपीठावर आला. भगवीं वस्त्रें परिधान केलेला, डोक्याला हिंदी पद्धतीचा फेटा बांधलेला असा तो एक तरुण हिंदु संन्यासी होता. हिंदुधर्माचें वैशिष्ट्य विशद करणारें, इतर वक्त्यांच्या मानानें फारच थोडा वेळ, असें या संन्याशाचें भाषण झालें. पण तें ऐकत असतां सबंध श्रोतृसमुदाय जणूं मंत्रमुग्ध झाला! इतर वक्त्यांचीं भाषणें श्रोत्यांनीं नुसतीं श्रवण केलीं होतीं. पण या शेवटच्या वक्त्याच्या शब्दांनीं त्यांच्या अंतःकरणाचा ठाव घेतला! त्यांचीं मनें कायमचीं जिंकून घेतलीं! भाषण संपवून हा संन्यासी खालीं बसतांच लोकांनीं त्याच्या नावाचा प्रचंड जयघोष केला!

दुसरे दिवशीं या सर्वधर्मपरिषदेच्या उद्घाटनाचा वृत्तांत देतांना इतर प्रतिनिधींचा नुसता नामनिर्देश करणाऱ्या अमेरिकन वर्तमानपत्रांनीं—'सर्वधर्म-परिषदेंतील सर्वांत मोठी व्यक्ति!'—या शब्दांनीं या संन्याशाचा गौरव केला!

या हिंदु संन्याशाचीं या परिषदेंतील यानंतरचीं वेदांततत्त्वज्ञानावरचीं व्याख्यानें तर इतकीं प्रभावी ठरलीं कीं, सर्व मानवजातींत बंधुत्वाची भावना निर्माण करण्याचें सामर्थ्य असलेला त्या तत्त्वज्ञानांतील संदेश म्हणजे अमेरिकन जनतेला एक नवजीवनाचा झराच वाटला!

'हिंदुस्थान देशांतील एक महान् द्रष्टे!' 'ईश्वराचे प्रेषित!' अशा विशेषणांनीं अमेरिकेंतील लोकांकडून त्यांच्याविषयींचा पूज्यभाव आतां व्यक्त होऊं लागला!

आजवर अमेरिकेंतच काय, पण खुद्द हिंदुस्थानांतही कोणाला माहित नसलेलें, या संन्याशाचें स्वामी विवेकानंद हें नांव आतां सबंध जगाला परिचित झालें; तें नांव जगद्वंद्य ठरलें!

ज्ञानसंपन्नतेच्या बाबतींत अग्रेसर अशा अमेरिकेसारख्या पाश्चात्य राष्ट्रामध्यें आपल्या वयाच्या अवघ्या तिसाव्या वर्षी, एवढा मोठा आध्यात्मिक विजय संपादन

करणाऱ्या या संन्याशाच्या आत्मबलामागें केवढी खडतर तपश्चर्या होती, याची जगाला त्या वेळीं जाणीव होती काय?

स्वामी विवेकानंदांचा जन्म १८६३ सालीं झाला. त्यांचें पूर्वाश्रमींचें नांव नरेंद्रनाथ दत्त असें होतें. निसर्गतःच असामान्य बुद्धिमत्ता व भावनाशीलता हे गुण त्याला लाभले होते. पण त्याच्या धर्मपरायण मातेकडून त्याच्या बालमनावर झालेल्या धार्मिक व सात्त्विक संस्कारांमुळें त्याच्या अंगचे हे दोन्ही गुण त्याच्या लहानपणींच पारमार्थिक जिज्ञासेकडे ओढ घेऊं लागले.

नरेंद्र लहानपणीं शाळेंतला अभ्यास मन लावून करी. व्यायाम, खेळ, कसरत यांची त्याला आवड होती. पशु, पक्षी पाळण्यांत त्याला आनंद वाटे. गोड आवाजाची देणगी मिळाली असल्यामुळें संगीतांतही त्यानें प्रगती करून घेतली होती. त्याच्या वयानुसार या सर्व प्रकारांमध्यें त्याचें चित्त रमे. पण या सर्व गोष्टींपासून दूर नेणारी, समवयस्क मुलांमध्यें तर सोडाच, पण प्रौढ माणसांमध्येंही न आढळून येणारी एक गूढ संवेदना, एक अंतःप्रेरणा मधून मधून त्याच्या हृदयामध्यें उचंबळून येई, त्याला अस्वस्थ करी, ईश्वरविषयक विचारांच्या तंद्रीमध्यें त्याला नेऊन सोडी!

अखेरीस कॉलेजांत शिकत असतां आपल्या वयाच्या सोळावे वर्षी कलकत्ता शहरानजिक दक्षिणेश्वर या ठिकाणीं कालीमातेच्या मंदिरांत वास्तव्य करणाऱ्या श्रीरामकृष्ण परमहंस यांची कीर्ति कानांवर आल्यामुळें नरेंद्र त्यांच्या दर्शनाला गेला. त्याच्या आयुष्यांतील हा एक अत्यंत भाग्याचा दिवस ठरला!

श्रीरामकृष्ण परमहंस हे ईश्वरसाक्षात्कार झालेले एक सत्पुरुष होते. पहिल्या भेटींतच त्यांच्या दर्शनानें नरेंद्राची स्थिती जादूनें भारल्यासारखी झाली! आपली अध्यात्मज्ञानाची तहान भागवण्याचें सामर्थ्य असलेली जगांत एखादी व्यक्ति असेल, तर ती एक श्रीरामकृष्ण परमहंसच, याची त्याला आतां मनोमय साक्ष पटली! यापुढें तो पुनः पुनः त्यांच्या दर्शनाला जाऊं लागला. त्यांच्या सहवासाचें जणूं त्याला आतां वेडच लागलें.

नरेंद्र बी. ए. झाला. बी. ए. झाल्यावर कायद्याचा अभ्यास करून वकील व्हावें, हा आपला पूर्वीचा विचार त्यानें आतां सोडून दिला. त्याच्या सर्व ऐहिक महत्त्वाकांक्षा लयाला गेल्या. श्रीरामकृष्ण परमहंसांसारख्या सद्गुरूच्या मार्गदर्शनानें अध्यात्मज्ञान प्राप्त करून घेणें, हेंच यापुढें त्याचें आयुष्यांतील एकमेव ध्येय ठरलें.

यानंतर सात वर्षांनीं श्रीरामकृष्ण परमहंस समाधिस्थ झाले. पण या सात वर्षांच्या अवधींत श्रीरामकृष्णांनीं नरेंद्रामध्यें असलेलें आत्मिक तेज इतकें

प्रज्वलित केलें होतें कीं, नरेंद्राच्या रूपानें ते मानवतेला एक मोठीच देणगी देऊन गेले, असें म्हणतां येईल.

आपल्या गुरूंचा, श्रीरामकृष्ण परमहंसांचा, आध्यात्मिक संदेश जगांतील अखिल मानवजातीपर्यंत नेऊन पोंहोंचवणें, हेंच आतां स्वामी विवेकानंदांनीं आपल्या आयुष्यांतील उद्दिष्ट टरवलें. त्याकरतां यापुढील सहासात वर्षें त्या कार्याच्या पूर्वतयारींत त्यांना घालवावीं लागलीं. या अवधींत लोकांकडून झालेली अवहेलना, उपहास ही त्यांच्या वांट्याला आलीं. परमार्थसाधनाकरतां हिमालयांत राहात असतांना व हिंदुस्थानांत टिकठिकाणीं निष्कांचन स्थितींत प्रवास करीत असतांना दिवसांचे दिवस त्यांना अर्धपोटीं राहून काढावे लागले. शरीराची आबाळ होऊन निरनिराळ्या आजारांतून त्यांना जावें लागलें. पण या सर्व गोष्टींमुळें त्यांचें मन खचलें नाहीं. आपल्या ध्येयावरील त्यांची निष्ठा यत्किंचितही ढळली नाहीं.

यानंतर सर्वधर्मपरिषदेंत भाग घेण्याकरतां ते अमेरिकेंत गेले. तेथील आपल्या कार्यामध्यें असामान्य यश मिळवून परत आल्यावर, संन्याशांनीं केवळ स्वतःची आध्यात्मिक उन्नति एवढेंच आपलें उद्दिष्ट टरवून स्वस्थ बसतां कामा नये, तर जनसेवेमध्येंहि आपलें आयुष्य वेंचलें पाहिजे, ही शिकवण आपल्या गुरुबंधूंना देऊन त्यांच्या सहकार्यानें त्यांनीं श्रीरामकृष्ण मिशन ही संस्था स्थापन केली. या संस्थेच्या शाखा आज सर्व हिंदुस्थानभर पसरल्या असून त्यांतील शेंकडों संन्यासी, लोकांमध्यें धार्मिक ज्ञानाचा प्रसार करणें, दुष्काळ, महापूर अशा आपत्तीमध्यें आपद्ग्रस्तांची सेवा करणें, शिक्षणसंस्था, दवाखाने चालवणें, अशा प्रकारचें कार्य करीत आहेत.

स्वामीजींचें यापुढील आयुष्य आपल्या देशबांधवांमध्यें आपल्या स्फूर्तिदायक विचारांचा प्रसार करण्यांत खर्च झालें. प्रत्येक मानवानें स्वतःमध्यें असलेल्या दैवीभावाची जाणीव करून घेतली पाहिजे व तें दैवी तेज त्याच्या जीवनांतील हरएक कृतीमध्यें व्यक्त झालें पाहिजे, हें त्यांच्या शिकवणीचें सार म्हणतां येईल.

१९०२ सालीं वयाच्या ३९ वे वर्षी स्वामी विवेकानंदांचें देहावसान झालें.

“आमच्या लहानपणीं स्वामी विवेकानंदांचे ग्रंथ आम्ही मोठ्या भक्तीनें वाचीत असूं. त्या ग्रंथांमुळेंच आम्हाला देशसेवेची प्रेरणा मिळाली!” हे नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे एका लेखांतील उद्गार, स्वामी विवेकानंदांनीं आपल्या देशबांधवांमध्यें केलेलें तेजस्वी विचारांचें बीजारोपण त्यांच्यामागून आलेल्या पिढीमध्यें कसें फलद्रूप झालें व या थोर विभूतीचें ऋण या आपल्या देशाच्या हृत्पटलावर कसें कायमचें कोरलें गेलें आहे, याची कल्पना आणून देण्यास पुरेसे आहेत!



दुधाचा द्रोण हातीं घेऊन गोपाळ हर्षभरित मनानें शाळेकडे चालला !

[ पृ. १४ ]

# गोपाळाची गोष्ट : : १

एका खेडेगांवीं एक ब्राह्मण राहात असे. जुन्या काळचा हा एक खरा ब्राह्मण होता. ब्राह्मण वर्गाच्या बाबतींत शास्त्रांनीं घालून दिलेले सर्व नियम तो कडक रीतीनें पाळी. ब्राह्मणांच्या ठिकाणीं द्रव्यलोभ असूं नये, अशी शास्त्राज्ञा असल्यामुळें फार पैसा मिळवावा, अशी हांव त्यानें कधींही बाळगली नाहीं. निर्लोभवृत्तीनें अध्ययन, अध्यापन हीं आपलीं कर्तव्यें पार पाडावीं, ईश्वराचें भजनपूजन करावें व इतरांनाही ईश्वरभक्तीचा मार्ग दाखवावा, अशा रीतीनें सुखासमाधानांत तो आयुष्य कंठीत असे.

दुर्दैवानें या ब्राह्मणाला अकालीं मरण आलें. त्याची बायको व त्याचें तान्हें मूल हीं आतां उघडीं पडलीं. त्यांची काळजी वाहायला, त्यांना मदत करायला नात्यागोत्यांतलें जवळचें असेंही त्यांना कोणी नव्हतें.

राहायला एक झोपडी; या ब्राह्मणाला कोणी तरी दान दिलेली जेमतेम एकदोघांच्या पोटापुरतें धान्य येईल अशी एक लहानशी भातजमीन; परसांत आठदहा आंब्याचीं, फणसाचीं व नारळीचीं झाडें; याशिवाय स्वतःची म्हणतां येईल अशी, या बिचाऱ्या विधवा बाईला आणखी कोणतीही मालमत्ता नव्हती. फुरसतीच्या वेळीं ती चरख्यावर सूत कांतीत असे. त्यामुळें तिच्या तुटपुंज्या उत्पन्नामध्यें थोडीशी भर पडे. नवरा वारल्यावर अशा ओढ-

घरत्तीच्या स्थितींत या बाईला यापुढें आपला व आपल्या मुलाचा— गोपाळाचा उदरनिर्वाह चालवावा लागला.

पण त्या ब्राह्मणाइतकीच त्याची बायकोही सत्त्वशील होती. तिची ईश्वरावर श्रद्धा होती. असें कष्टाचें जिणें आपल्या नशिबीं घातल्याबद्दल तिनें देवाला कधीं दोष दिला नाहीं. उलट त्यानें आपल्याला एक मूल दिलें आहे, हे त्याचे आपल्यावर मोठेच उपकार असें ती मानी !

श्रीकृष्ण हें तिचें आवडतें दैवत होतें. त्याची आपल्यावर कृपादृष्टी आहे, तो आपला पाठीराखा आहे, अशी तिची दृढ भावना बनली होती.

त्या झोंपडींतच एका बाजूला एका चौरंगावर तिनें मुरलीधर बालकृष्णाच्या मूर्तीची स्थापना केली होती. गृहकृत्यें करून राहिलेला दिवसांतला सारा वेळ ती या मूर्तीची पूजाअर्चा, भजनपूजन करण्यांत घालवी व तें करतांना त्या मूर्तीशीं ती इतकी तन्मय होऊन जाई कीं, हा बाळकृष्ण जणूं सजीवच आहे, असें तिला वाटे! चालत्या बोलत्या माणसाची सेवा करावी, त्याप्रमाणें ती या मूर्तीची सेवा करी !

कांहीं वर्षे गेलीं. तिचा मुलगा गोपाळ हा शाळेंत जाण्याइतका मोठा झाला. गांवांतल्या इतर मुलांबरोबर तिनें आतां त्याला शाळेंत पाठवावयाचें ठरवलें. एक दिवस शुभमुहूर्तावर पाटीदप्तर घेऊन गोपाळ शाळेंत जायला निघाला. त्यावेळीं तें दृश्य पाहून तिच्या

मनाला किती आनंद वाटला ! पण त्या दिवशीं गोपाळ शाळेंतून घरीं आल्यावर त्याच्या तोंडून निघालेले शब्द ऐकून तिचा तो आनंद ओसरला !

शाळेंत जातांना गोपाळाला इतर मुलांची सोबत होती. शाळा सुटल्यावर घरीं जायला उतावीळ झालेलीं तीं इतर मुलें धांवत पळत आपापल्या घरीं गेलीं. गोपाळाची त्यांना आठवणच राहिली नाहीं. तो एकटाच घरीं यायला निघाला. त्याच्या शाळेची वाट एका माळरानांतून गेली होती. या माळरानांतून तो घरीं येत असतां दिवस मावळला व वाटेंतल्या एका गर्द झाडीपाशीं त्याला भीती वाटली.

"आई ग ! मला नाहीं जायचं उद्यां शाळेंत. रानांतल्या त्या झाडीपाशीं मला भीती वाटते !" घरीं येऊन पोहोंचतांच गोपाळ आपल्या आईला म्हणाला.

आपल्या या एवढ्याशा पांच वर्षांच्या मुलाला शाळेंत एकटें जावें लागतें. त्याजबरोबर सोबत म्हणून कोणी माणूस पाठवायला आपल्याला ऐपत नाहीं. या विचारानें गोपाळच्या आईला तिच्या वैधव्याची व दारिद्र्याची यावेळीं जाणीव करून दिली. तिचें मन कष्टी झालें !

दुसरे दिवशीं गोपाळाची शाळेंत जाण्याची वेळ झाल्यावर त्याची समजूत करण्यासाठीं ती म्हणाली, "बाळ, त्या रानांतून शाळेंत जातांयेतांना तुला भीती वाटण्याचें कारण नाहीं. त्या रानांत माझा दुसरा एक मुलगा राहात असतो. त्याचेंही नांव

गोपाळच ! तो त्या रानांत रोज गाई चारीत असतो. त्याची तेथें सर्वत्र वस्ती आहे. त्याला नुसती हांक मारली, त्याचें फक्त नांव घेतलें, तरी वाघसिंहासारखीं भयंकर जनावरें, त्याचप्रमाणें चोर, लुटारू अशीं दुष्ट माणसें पळून जातात; एवढा त्यांना त्याचा धाक वाटतो ! तुला केव्हांही भीती वाटली, तर मोठ्यानें त्या तुझ्या दादाला तूं हांक मार, म्हणजे झालें !"

गोपाळ त्या श्रद्धावंत आईचाच मुलगा होता. तिच्या दुधावर जसें त्याचें शरीर, तसेंच तिच्या श्रद्धेच्या गुणावर त्याचें मन वाढलें होतें. आईचे हे शब्द ऐकतांच त्याची सारी भीती नाहींशी झाली. मोठ्या उल्हसित मनानें तो शाळेंत गेला.

संध्याकाळीं शाळेंतून परत येतांना त्या गर्द झाडीजवळ पोहोंचल्यावर त्याला पुनः भीती वाटली. तत्क्षणीं आईच्या सांगण्याप्रमाणें त्यानें हांका मारायला सुरवात केली, "गोपाळदादा, गोपाळदादा !" "दादा तूं येथें आहेस ना ? तूं या रानांत सगळीकडे असतोस असें आईनें मला सांगितलें आहे. मग तूं ओ कां देत नाहींस ? ये, लवकर ये, मला भीती वाटते !" आपल्या दादाला उद्देशून अशारीतीनें तो बोलूं लागतांच त्या झाडींतून गंभीर पण प्रेमळ आवाजांत उत्तर आलें, "माझ्या लहानग्या भावा, तूं भिऊं नकोस ! शांत चित्तानें घरीं जा. मी तुझ्या मागोमागच आहें."

हें उत्तर ऐकल्यावर गोपाळ निर्धास्त मनानें घरची वाट चालूं लागला.

केव्हांही शाळेंतून जातां येतांना भीती वाटली कीं, गोपाळानें आपल्या गोपाळदादाला हांक मारावी व ती हांक ऐकतांच त्याच्या दादाकडून प्रेमळ शब्दांत उत्तर यावें, असा प्रकार यापुढें पुनः पुनः घडूं लागला. गोपाळानें हें सर्व आपल्या आईला सांगितलें तेव्हां तिला आश्चर्य वाटलें. एक दिवस ती गोपाळाला म्हणाली, "बाळ, आज तुझ्या दादानें ओ दिली, म्हणजे त्याला झाडींतून बाहेर बोलाव."

त्याप्रमाणें त्या झाडीपाशीं गोपाळाच्या हांकेला त्याच्या दादाकडून त्या दिवशीं ओ येतांच गोपाळानें त्याला बाहेर यायला सांगितलें.

"बाळ, मी गाई चारीत आहें. त्यांना सोडून मला तुझ्याकडे येतां येत नाहीं." झाडींतून शब्द निघाले. पण गोपाळ त्या दिवशीं आपला हट्ट सोडीना ! तो पुनः पुनः हांका मारूं लागला. आपल्या दादाच्या विनवण्या करूं लागला. अखेरीस त्यानें ओक्साबोक्शीं रडायलाही सुरवात केली. तेव्हां हातांत बांसरी आहे, डोक्यावर मोरपिसांची टोपी आहे, गळ्यांत रानफुलांची माळ घातली आहे, असा गोपाळाहून पांच सहा वर्षांनींच मोठा, असा गोड व हंसऱ्या चेहऱ्याचा, प्रेमळ दृष्टीनें त्याच्याकडे पाहाणारा त्याचा गोपाळदादा त्या झाडींतून त्याच्याजवळ येऊन उभा राहिला ! गोपाळाच्या हर्षाला आतां

सीमा राहिली नाहीं! त्यानें आपल्या दादाला प्रेमभरानें जाऊन मिठी मारली! आपल्यावरचें गोपाळाचें हें प्रेम पाहून गोपाळदादाही आनंदित झाला. तो गोपाळाला आपली बांसरी वाजवून दाखवूं लागला. झाडावर चढून तेथलीं पिकलेलीं फळें तोडून त्याला देऊं लागला. आपल्या गाईवांसरांच्या गमतीच्या गोष्टी त्याला सांगूं लागला. त्याजबरोबर हंसूं खेळूं लागला.

यापुढें शाळेंत जातां येतांना रोज आपल्या दादाला झाडीबाहेर बोलावून त्याजबरोबर कांहीं वेळ हंसण्याखेळण्यांत घालवण्याचा गोपाळाचा हा नवा क्रम आतां सुरू झाला!

गोपाळाकडून हा नवा प्रकार त्याच्या आईला कळल्यावर तिचें अंतःकरण उचंबळून आलें! तिच्या डोळ्यांतून प्रेमाश्रूंच्या धारा सुरू झाल्या! आपल्या दारिद्र्याचें व वैधव्याचें दुःख ती पार विसरून गेली! आपण व आपला गोपाळ किती भाग्यवान् आहोंत, असें तिला आतां वाटूं लागलें!

कांहीं दिवसांनीं गोपाळाच्या गुरुजींच्या घरीं त्यांच्या वडिलांचें श्राद्ध होतें. ज्या जुन्याकाळची ही गोष्ट आहे, त्याकाळीं शाळेंत जाऊन शिकणाऱ्या मुलांनीं शिकण्याबद्दल आपल्या गुरुजींना कांहीं ठराविक पैसे देण्याची पद्धत नव्हती. गुरुजींच्या उदरनिर्वाहाला लागणारा दाणागोटा, भाजीपाला अशा वस्तु मुलांचे आईबाप आपापल्या ऐपतीप्रमाणें त्यांना देत व तेवढ्यावर

ते संतुष्ट राहात. मात्र एखादे वेळीं गुरुजींच्या घरीं कांहीं विशेष कार्यप्रसंग उपस्थित झाला, तर त्यावेळच्या त्यांच्या गरजाही मुलांच्या आईबापांनीं भागवाव्या, असा प्रघात होता. त्याप्रमाणें दुसरे दिवशीं गुरुजींच्या घरीं श्राद्ध आहे, हें कळतांच त्यांच्याकरतां वरून कोणकोणत्या वस्तू आणाव्यात, याबद्दल शाळेंतल्या मुलांचीं आपसांत बोलणीं सुरू झालीं.

त्या दिवशीं घरीं गेल्यावर गोपाळानें ही गोष्ट आपल्या आईला सांगितली व दुसरे दिवशीं गुरुजींना नेऊन देण्याकरतां त्यांना श्राद्धाच्या दिवशीं उपयोगी पडेल, अशी एखादी वस्तू तो तिच्याजवळ मागूं लागला.

गोपाळाच्या गुरुजींना देण्यासारखें त्याच्या त्या बिचाऱ्या आईजवळ काय होतें! आपल्या गरिबीच्या स्थितीमुळें आपल्या लाडक्या बाळाची ही एवढीशी हौसही आपल्याला पुरवतां येत नाहीं, याबद्दल तिला फार वाईट वाटलें! इतक्यांत तिला एक विचार सुचला. "बाळ," ती गोपाळाला म्हणाली, "तुझ्या गुरुजींना देण्यासारखें आपल्या घरीं कांहीं नाहीं. पण तूं उद्यां शाळेंत जातांना तुझ्या दादाला हांक मार, व त्याजकडून एखादी वस्तु मागून घे."

आईनें सांगितल्याप्रमाणें गोपाळानें दुसरे दिवशीं गोपाळदादाला हांक मारली व शाळेंतली हकिगत सांगून त्याच्या जवळ एखादा जिन्नस तो मागूं लागला.

"बाळ, मी एक गुराखी आहें. तुझ्या गुरुजींना देण्यास माझ्याजवळ चांगल्या वस्तू कुठल्या असणार? पण या माझ्या कपिला गाईचें दूध मी काढून देतों. तें नेऊन तूं आपल्या गुरुजींना दे." असें म्हणून गोपाळदादानें एका द्रोणामध्यें, आपल्या गाईचें दूध पिळून तें त्याला दिलें.

दादानें दिलेला दुधाचा द्रोण हातीं घेऊन गोपाळ हर्षभरित मनानें शाळेकडे निघाला!

शाळेंतलीं इतर मुलें मेवामिठाई, चांगलीं चांगलीं फळें, अशा घरून आणलेल्या किंमतवान् वस्तू गुरुजीपुढें नेऊन ठेऊं लागल्या-वर गोपाळानेंही आपला दुधाचा द्रोण नेऊन त्यांच्यापुढें ठेवला.

गोपाळ गुरुजींना देण्याकरतां थोडेंसें दूध घेऊन आला आहे, असें पाहातांच इतर मुलें चेष्टेनें खो खो हंसूं लागलीं. इतक्यांत एक चमत्कार घडून आला व त्या सर्वांचें हंसें एकदम बंद पडलें!

गोपाळानें गुरुजींच्या समोर नेऊन ठेवलेला द्रोण त्यांनीं उचलला व त्यांतील दूध एका मोठ्या भांड्यांत ते ओतूं लागले. पण काय नवल सांगावें! द्रोणाचें तोंड वर होतांच तो पुनः दुधानें भरून निघाला! गुरुजींनीं पुनः एकदां तो त्या भांड्यांत रिता केला. पण पुनः तो दुधानें भरलेलाच! शेवटीं गुरुजींच्या घरचा हंडासुद्धां दुधानें भरून निघाला! पण गोपाळाचा द्रोण कांहीं रिता होईना!

गुरुजींनीं गोपाळाला जवळ घेतलें व त्याला विचारलें, "बेटा, हें दूध तुला कोणी दिलें? हा द्रोण तूं कोठून आणलास?"

"वाटेंतल्या त्या रानांत माझा गोपाळदादा राहातो. तो तेथें गाई चारीत असतो. मी हांक मारली कीं, तो धांवत येऊन मला भेटतो व मजबरोबर खेळतो. त्यानें आज हा दुधानें भरलेला द्रोण मला दिला!" गोपाळानें उत्तर केलें.

हें ऐकून गुरुजींना अधिकच आश्चर्य वाटलें. तें त्याला म्हणाले, "तुझ्या त्या गोपाळदादाकडे मला घेऊन जा पाहूं!"

गुरुजींची ही आज्ञा गोपाळानें मोठ्या आनंदानें मान्य केली. त्यांना घेऊन तो त्या झाडीपाशीं आला व आपल्या गोपाळदादाला हांका मारूं लागला. पण त्याचा दादा आज मुळींच ओ देईना. शेवटीं गोपाळ रडकुंडीला येऊन म्हणाला, "गोपाळदादा, आतां तूं आला नाहींस, तर मी खोटें बोलतों असें गुरुजींना वाटेल!" केविलवाण्या स्वरांत गोपाळाच्या तोंडून हे शब्द निघतांच उत्तरादाखल झाडींतून एक गंभीर वाणी ऐकूं आली, "बाळ, तुझ्या आणि तुझ्या आईच्या अंतःकरणासारखें प्रेमळ अंतःकरण ज्यांना लाभलें असेल, त्यांनाच मी भेटतों. तुझ्या गुरुजीला सांग कीं, माझी भेट व्हावयाला आणखी बरेच जन्म त्याला घ्यावे लागतील!"

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
६५५२० दि. १०।१०।७४
३६६५ नोंद दि. १९।३।७७

# खरी ईश्वरभक्ति : : २

एकदां एक राजा रानांत शिकारीसाठीं गेला असतां तेथें त्याला एक तपस्वी आढळून आला. त्या तपस्व्यापाशीं कांहीं वेळ संभाषण केल्यावर राजाच्या मनांत त्याच्याविषयीं पूज्यभाव उत्पन्न झाला व त्याला एखादी मौल्यवान् वस्तू भेट म्हणून देण्याची राजानें इच्छा व्यक्त केली. तपस्वी म्हणाला, "राजा, तूं जरी फार मोठ्या संपत्तीचा व ऐश्वर्याचा मालक असलास, तरी तुझ्या-जवळ अशी कोणतीही मौल्यवान् वस्तू नाहीं कीं, जिचा मला उपयोग होईल. मी या रानांत राहातों व येथें मला कुठल्याही सुखाची उणीव नाहीं. रानांतल्या या वृक्षांचीं फळें माझी भूक शमन करतात. येथल्या या निर्मळ झऱ्याचें पाणी पिऊन मी माझी तहान भागवतों. या रानांतल्या एखाद्या गुहेमध्यें पहुडलों, म्हणजे रात्रीं मला गाढ झोंप लागते. याहून अधिक कुठल्याही वस्तूची मला जरूर नाहीं."

"आपल्याला कशाचीही जरूर नसली, तरी मी दिलेली एखादी वस्तू आपल्यासारख्या थोर तपस्व्यानें ग्रहण केली, तर त्यामुळें माझ्या अंतःशुद्धीला मदत होईल; मला मानसिक समाधान लाभेल. तरी एवढ्याकरतां तरी आपण माझ्याबरोबर राजधानींत या व मी भेटीदाखल दिलेल्या एखाद्या वस्तूचा स्वीकार करा." अशी यानंतर राजानें फारच गळ घातल्यामुळें तपस्वी त्याच्याबरोबर त्याच्या राजधानींत गेला.

राजानें तपस्व्याला राजवाड्यांत नेलें; सुवर्णानें व रत्नामाणकांनीं भरलेलें आपलें भांडार व तेथलें इतर सर्व ऐश्वर्य त्याला दाखवलें व नंतर एक रत्नखचित सुवर्णासन त्याला बसायला देऊन देवपूजेची वेळ झाली असल्यामुळें राजा पूजेला बसला. देवाची पूजाअर्चा आटोपल्यावर राजा ईश्वराची प्रार्थना करूं लागला, "देवा, माझ्या राज्याचा अधिक विस्तार घडवून आण. मला आणखी मुलेंबाळें होऊं दे; माझ्या संपत्तीमध्यें आणखी भर घाल!" राजाच्या तोंडून निघालेले ते प्रार्थनेचे शब्द कानीं पडतांच तपस्वी त्या रत्नखचित सुवर्णासनावरून ताडकन् उठला व राजवाडा सोडून चालायला लागला. तें पाहून राजाला अचंबा वाटला. घाईघाईनें जाऊन त्यानें तपस्व्याला गांठलें व म्हटलें, "महाराज, कबूल केल्याप्रमाणें माझ्याकडून एखाद्या वस्तूचा स्वीकार करण्यापूर्वीच आपण येथून जायला निघालांत, हें काय?"

तपस्व्यानें उत्तर दिलें, "तूं कसला राजा? तूं तर एक भिकारी आहेस! एका भिकाऱ्यानें दिलेल्या कोणत्याही वस्तूचा स्वीकार करण्याची माझी इच्छा नाहीं!"

राजा अधिकच बुचकळ्यांत पडला व त्याच्या तोंडून आश्चर्याचे उद्गार निघाले, "मी भिकारी?"

"हो! रस्त्यावर हात पसरून लोकांकडे भीक मागणाऱ्या एखाद्या भिकाऱ्यामध्यें व तुझ्यामध्यें कांहींहीं फरक नाहीं. नुकताच तूं देवाकडे, मला हें दे, मला तें दे, म्हणून भिक्षा मागत होतास. अशारीतीनें ईश्वराकडे भिक्षा मागणें म्हणजे ईश्वरावर प्रेम करणें, ईश्वराची भक्ति करणें

नव्हे. प्रेमभावाची भाषा निराळी असते. देवा, मी रोज तुझी पूजा-अर्चा करीत असतों, त्याच्या मोबदला मला ही वस्तू दे, ती वस्तू दे, अशारीतीनें एखादा माणूस देवाची प्रार्थना करूं लागला, तर मग हृदयांत ईश्वराविषयीं प्रेम बाळगणें व ईश्वराशीं व्यापार करणें, यांत फरक तो काय राहिला? ईश्वराच्या बाबतींतच नव्हे तर इतर कुणाच्याही बाबतींत, नेहमीं देणारें व घेण्याची वांच्छा कधींही न करणारें तेंच खरें प्रेम!" असें पुनः उत्तर देऊन राजाकडून कुठल्याही वस्तूचा स्वीकार न करतां तपस्व्यानें आपला अरण्याचा रस्ता सुधारला.

---

# परमेश्वरस्वरूप कोणाला कळेल? : ३

भगवान् बुद्धाच्या काळीं आपल्या या हिंदुसमाजांत धर्माचें बाह्य अवडंबर फार माजलें होतें व धर्माच्या खऱ्या हेतूकडे लोकांचें दुर्लक्ष्य होऊं लागलें होतें. यज्ञयागादि कर्मकांड; ईश्वराचें अस्तित्व व त्याचें स्वरूप याविषयीं शुष्क काथ्याकूट; धर्मज्ञानाचा मक्ता स्वतःकडे घेऊन तें ज्ञान सर्वसामान्य लोकांपासून दूर ठेवण्याचा भिक्षुकवर्गानें चालवलेला खटाटोप; या सर्व अनिष्ट प्रकारांना त्याकाळीं ऊत आला होता. त्यास आळा बसावा व सदाचार, या एकाच साध्या तत्त्वावर धर्माची उभारणी झाली आहे, ही शिकवणूक समाजांतील उच्च नीच समजल्या जाणाऱ्या एकूणएक सर्व माणसांना द्यावी, या हेतूनें भगवान् बुद्धानें बौद्धधर्म या नांवानें आज ओळखला जाणारा, हिंदुधर्मामध्यें एक नवीन पंथ त्याकाळीं निर्माण केला. भगवान् बुद्धानें स्थापन केलेल्या या नव्या बौद्ध धर्माचें सार पुढील लहानशा गोष्टींत सामावलेलें आहे.

एकदां कुठले तरी पांच ब्राह्मण बुद्धाकडे आले व म्हणाले, "ईश्वरासंबंधीं आमच्यांत वाद निर्माण झाला आहे, तो तुम्ही मिटवा."

नंतर त्यांपैकीं एक ब्राह्मण बोलला, "अमक्या ग्रंथांत सांगितल्याप्रमाणें ईश्वराचें स्वरूप अमुक प्रकारचें आहे व त्याची प्राप्ति



“ईश्वराप्रमाणें तुम्ही पवित्र बना, पवित्र कृती करा.” [पृ. २१]

३५६७

करून घेण्याचा मार्ग हा असा आहे" त्याच्या या विधानाला हरकत घेऊन दुसरा ब्राह्मण म्हणाला, "याचें ईश्वरासंबंधींचें ज्ञान चुकीचें आहे. कारण दुसऱ्या एका मी पढलेल्या ग्रंथांत ईश्वराच्या स्वरूपासंबंधीं व त्याची प्राप्ति करून घेण्यासंबंधीं निराळेंच सांगितलें आहे व तेंच खरें आहे." इतर तिघां ब्राह्मणांनींही अशाच प्रकारें इतर ग्रंथांतील आधार दाखवून ईश्वरीस्वरूपासंबंधींचीं आपलीं निरनिराळीं मतें प्रतिपादन केलीं.

त्या पांचही ब्राह्मणांचें म्हणणें ऐकून घेतल्यावर बुद्धानें त्या सर्वांना प्रश्न केला, "तुम्ही ज्या निरनिराळ्या ग्रंथांचा आधार देतां त्यांपैकीं एकांतही, ईश्वर अपवित्र आहे; तो दुष्ट आहे; तो इतरांवर अन्याय करतो; असें सांगितलें आहे का?"

ब्राह्मणांनीं उत्तर दिलें, "नाहीं. ईश्वर पवित्र आहे; त्याची प्रत्येक कृति मांगल्यानें, सत्यानें भरलेली आहे; तो न्यायी, दयाळू आहे; याबद्दल आमच्या साऱ्या निरानिराळ्या ग्रंथांमध्यें एकवाक्यता आहे."

"तर मग भल्या गृहस्थांनो," बुद्ध त्यांना म्हणाला, "ईश्वराच्या स्वरूपाचा व्यर्थ काथ्याकूट करीत बसण्यापेक्षां त्याच्याप्रमाणें तुम्ही पवित्र बना, पवित्र कृती करा, प्राणिमात्रांशीं दयाळूपणानें वागा, म्हणजे त्या ईश्वराचें खरें दर्शन तुम्हांला होईल!"

—

# आत्मविकासाची कसोटी : : ४

प्राचीनकाळीं व्यास नांवाचे एक ऋषी होऊन गेले. या व्यास ऋषींच्या बापानें शास्त्राध्ययनाच्या व जपतप इत्यादि साधनांच्या द्वारें आत्मिक विकासाच्या बाबतींत पूर्णत्व मिळवण्याचा आयुष्यभर प्रयत्न केला, पण त्यांत त्याला यश आलें नाहीं. व्यासाचा आजा, पणजा अशा इतर पूर्वजांनीं या बाबतींत केलेले प्रयत्नही निष्फळ झाले. खुद्द व्यासऋषी परमार्थज्ञानामध्यें त्या काळच्या सर्व ऋषींमध्यें श्रेष्ठ गणले जात. पण त्यांनाही आत्मिक विकासाची ती पूर्णावस्था स्वतःला प्राप्त झाली आहे, असें वाटत नसे.

या व्यास ऋषीला शुक नांवाचा एक मुलगा होता. अध्यात्मज्ञानांत तो पारंगत व्हावा, म्हणून व्यासऋषींनीं त्याच्या अध्ययनाच्या बाबतींत फार काळजी घेतली होती. आपल्यापाशीं असलेलें सर्व ज्ञान या आपल्या मुलानें संपादन केलें; आणखी त्याची प्रगति होईल, असें त्याला शिकवण्यासारखें आपल्याकडे कांहीं नाहीं, असें पाहिल्यावर व्यास ऋषींनीं त्याला अधिक ज्ञानप्राप्तीकरितां जनक राजाकडे पाठवलें.

जनक हा जरी एक राजा होता, तरी ब्रह्मज्ञानाच्या बाबतींत त्याची बरोबरी करणारा त्याकाळीं मोठमोठ्या ऋषींमध्यें-सुद्धां कोणी नव्हता. त्याचा देहभाव पूर्णपणें लयाला गेला होता.

स्वतःच्या देहाचा विसर पडणें व केवळ आत्मानंदामध्येंच तल्लीन होणें, ही जी अध्यात्मज्ञानाची परिसीमा, ती या राजानें गांठली होती. म्हणूनच 'विदेही जनक' या नांवानें लोक त्याला संबोधीत. शुकाला जर कोणाकडून अधिक ज्ञानप्राप्ती होणें शक्य असेल, तर ती अशा या जनकराजाकडूनच, असें व्यासऋषीला वाटावें, हें साहजिकच आहे.

व्यासऋषीचा मुलगा शुक हा कोणत्या उद्देशानें आपल्याला भेटायला येत आहे, हें जनकराजाला आधींच कळलें असल्यामुळें त्याला कशारीतीनें वागवायचें, यासंबंधींच्या सूचना त्यानें आपल्या सेवकांना देऊन ठेवल्या होत्या.

---

शुक जनकराजाच्या राजवाड्याच्या प्रवेशद्वारापाशीं येऊन पोहोंचला व जनक राजाच्या भेटीची इच्छा त्यानें व्यक्त केली. पण देवडीवरच्या पहारेकऱ्यांनीं त्याच्याकडे विशेष लक्ष न देतां देवडीबाहेरच त्याला बसायला सांगितलें. तीन दिवस व तीन रात्रीं शुक तेथें बसून होता. व्यासासारख्या एवढ्या मोठ्या ऋषीचा शुक हा मुलगा; अल्पवयांतच त्यानें संपादन केलेल्या अध्यात्म-ज्ञानामुळें स्वतः शुकाच्या नांवाचीसुद्धां देशोदेशीं ख्याती पसरलेली; पण देवडीवरच्या त्या यःकश्चित् पहारेकऱ्यांनीं सतत तीन दिवस व तीन रात्री त्याला देवडीवर बसवून ठेवलें; त्याची नीट विचारपूससुद्धां केली नाहीं; तरी यामुळें राग, खेद अशा विकारांचा

त्याच्या मनास स्पर्शही झाला नाहीं. त्याच्या मनाची शांति यत्किंचितही ढळली नाहीं.

यानंतर नवलाची गोष्ट ही कीं, एकाएकीं जनकराजाचे मंत्री, उपमंत्री, सेनापती, सरदार, दरकदार असे दरबारांतले मोठमोठे अधिकारी त्या देवडीपाशीं त्याला सामोरे आले व अत्यंत सन्मानपूर्वक त्यांनीं त्याला राजसभेमध्यें नेलें. तेथें जनकराजानेंही त्याला उच्चासन देऊन त्याचा आदर केला.

पण अशा रीतीनें खुद्द जनकराजाकडून व त्याच्या श्रेष्ठ अधिकाऱ्यांकडून झालेल्या या आदरसन्मानानेंही शुक हुरळून गेला नाहीं. त्याच्या मनाला हर्ष, अभिमान या विकारांचा यावेळींही स्पर्श झाला नाहीं. त्याच्या शांत, निश्चल मनःस्थितीमध्यें लवलेशही फरक पडला नाहीं.

राजसभा बरखास्त झाल्यावर जनकराजानें शुकाला आपल्या बरोबर राजवाड्यांत नेलें व उत्तम रीतीनें शृंगारलेल्या एका राजमहालामध्यें त्याची राहण्याची सोय करून रोज गुलाबपाण्याची अंघोळ, अंगावर वापरायला उंची रेशमी वस्त्रेंप्रावरणें, अनेक मिष्टान्नांचें सुग्रास जेवण, सेवेला अष्टौप्रहर दासदासी; अशा प्रकारच्या शुकानें पूर्वीं कधींही न पाहिलेल्या सुखामध्यें तेथें सतत आठ दिवस त्याला ठेवलें.

नंतर नववे दिवशीं राजसभा भरवून जनकराजानें शुकाला तेथें बोलावलें.

क्रमांक ... नोंद दि.

शुक सभेंत आल्यावर नृत्यगायनांत पारंगत अशा सुंदर, तरुण स्त्रियांचें अप्रतिम नृत्य व गायनवादन तेथें सुरू झालें. जणूं इंद्रसभेचीच त्या राजसभेला शोभा प्राप्त झाली!

तें नृत्य व गायनवादन ऐन रंगांत आलें आहे, अशा वेळीं जनकराजानें काठोकांठ दुधानें भरलेला एक पेला आणवला व तो शुकाच्या हातीं देऊन त्या पेल्यांतील एकही थेंब पेल्याबाहेर पडूं न देतां राजसभेभोंवतीं सात फेऱ्या करण्यास त्यास सांगितलें.

जगांत पूर्वीं कुठेंही ऐकायला पाहायला मिळालें नाहीं, कुठल्याही माणसाचें मन वेडावून जाईल, अशा प्रकारच्या राजसभेंतील त्या अपूर्व वादनानें व सुंदर स्त्रियांच्या नृत्यगायनानें राजसभा निनादत असतां, शुक हातीं पेला घेऊन चालूं लागला. यांतील एकही थेंब बाहेर सांडूं न देतां त्यानें या सात फेऱ्या पुऱ्या केल्या. राजसभेंत चाललेला नाचरंग त्याचें मन यत्किंचितही चलित करूं शकला नाहीं. त्यामुळेंच दुधाचा एकहि थेंब बाहेर सांडूं न देतां त्याला त्या सात फेऱ्या पुऱ्या करतां आल्या.

तें पाहिल्यावर जनकराजा संतुष्ट मनानें शुकाला म्हणाला, " बेटा, तुला देण्यासारखें अधिक ज्ञान मजजवळ आहे, असें मला वाटत नाहीं. कांहीं शिकवण्याचा मीं प्रयत्न केला, तर पूर्वींच तुला अवगत झालेल्या ज्ञानाचा पुनरुच्चार केल्यासारखें होईल,

एवढेंच. तुझ्या पित्याकडून, व्यास मुनीकडून तुला झालेली ज्ञान-प्राप्ति व तिच्या जोडीला तूं स्वतःच्या प्रयत्नानें मिळवलेलें ज्ञान या दोन्हीमुळें तुझा जो आत्मविकास झाला आहे, त्यांत अधिक भर घालणें मलाही शक्य नाहीं. बाह्यसृष्टींतलि बऱ्यावाईट कसल्याही उपाधीपासून ज्या मानवाचें मन पूर्णपणें अलिप्त राहूं शकतें, त्या उपाधीमुळें ज्याच्या मनाची निश्चलता ढळत नाहीं, त्याचें मन जगांतल्या या पाशांपासून मुक्त झालें आहे, असेंच म्हटलें पाहिजे. अशा प्रकारचें निरामय, मुक्त मन असणें, हीच सर्वश्रेष्ठ ज्ञानाची, अत्युच्च आत्मविकासाची खरी कसोटी होय. तूं या कसोटीला पूर्णपणें उतरलास. तूं संपूर्णतः ज्ञानी आहेस. त्या सत्तत्वाचा तुला बोध झाला आहे. तरी तूं आपल्या पित्याकडे परत जा ! ”


# खरा यज्ञ : : ५

कुरुक्षेत्रावर झालेल्या युद्धांत कौरवांवर विजय मिळवल्यावर पांडवांनीं एक मोठा यज्ञ केला व त्या यज्ञानिमित्त पूर्वी केव्हांही कोणी केला नव्हता, एवढ्या मोठ्या प्रमाणांत गोरगरिबांना दानधर्म केला.

पांडवांनीं केलेला तो अमर्याद दानधर्म पाहून सर्व लोक चकित झाले, व त्यांची स्तुती करूं लागले. पण हा यज्ञ संपतांच यज्ञ-मंडपामध्यें एक मुंगूस आलें. त्याच्या अंगाचा अर्धा भाग सोन्या-सारखा चकाकत होता. ज्या ठिकाणीं यज्ञदेवी होती, त्या ठिकाणीं जाऊन तें मुंगूस कांहीं वेळ गडबडां जमिनीवर लोळलें, व नंतर पांडवांच्या त्या यज्ञाची तारीफ करणाऱ्या तेथें जमलेल्या लोकांना म्हणालें, " तुम्ही लोक पांडवांच्या या यज्ञाची उगीच तारीफ करतां आहांत. हा मुळीं यज्ञच नव्हे. "

त्या मुंगसाचें हें म्हणणें ऐकून लोकांना विस्मय वाटला.

" काय ! हा यज्ञच नव्हे ! आम्ही तर एवढा मोठा यज्ञ दुसऱ्या कोणी केल्याचें पाहिलेंही नाहीं व ऐकलेंही नाहीं. या यज्ञानिमित्त पांडवांनीं किती अगणित द्रव्य लाखों गोरगरिबांना वाटलें व त्यांना जन्माचें सुखी केलें, हें तुला माहीत नाहीं, असें दिसतें. "



" तुम्ही उगीच या यज्ञाची तारीफ करतां आहांत, हा मुळीं यज्ञच नव्हे ! "

[ पृ. २७ ]

यावर त्या मुंगुसानें पूर्वी घडलेली एक गोष्ट त्यांस सांगायाला सुरवात केली. तें म्हणालें, “ कांहीं वर्षांमागें येथून जवळच असलेल्या एका गांवामध्यें एक गरीब ब्राह्मण राहात असे. त्याच्या कुटुंबांत त्या ब्राह्मणाची बायको, त्याचा मुलगा व सून अशीं आणखी तीन माणसें होतीं. एकदां त्या गांवांत व त्या गांवाच्या आसपासच्या प्रदेशामध्यें सतत तीन वर्षे दुष्काळ पडला. त्या ब्राह्मणाची आधींच गरिबीची स्थिती, तशांत असा दुष्काळ पडलेला. त्यामुळें त्याच्या कुटुंबांतील माणसांचे फारच हाल होऊं लागले. शेवटीं शेवटीं तर दिवसांचे दिवस अन्नावांचून काढण्याची त्यांच्यावर पुनः पुनः पाळी येऊं लागली. एकदां अशीच लागोपाठ तीनचार दिवस त्या सर्वांची उपासमार झाल्यावर मोठ्या प्रयत्नानें त्या ब्राह्मणानें कुठून तरी एका दिवसापुरतें थोडेंसें बाजरीचें पीठ मिळवलें व तें घेऊन तो घरीं आला. नंतर त्या पिठाच्या चार भाकरी करून तीं चारही माणसें आतां जेवायला बसणार, तोंच कोणीतरी त्यांचें दार ठोठावीत असल्याचें त्यांना ऐकूं आलें. त्यांनीं दार उघडलें व पाहतात तों एक भुकेलेला वाटसरू दाराशीं उभा. लगेच ब्राह्मणानें त्याला आंत बोलावलें. हातपाय धुवायला त्याला पाणी दिलें व आपल्या वांट्याला आलेली भाकरी त्याला खायला दिली. ती भाकरी एक दोन घासांतच खाऊन टाकल्यावर तो वाटसरू म्हणाला, “ या दुष्काळामुळें बरेच दिवस माझ्या पोटांत अन्नाचा एक कणही गेला नव्हता. एवढीशी ही भाकरी खाऊन माझी भूक कशी भागणार ? उलट ती

भूक आतां अधिकच वाढून त्यामुळें होणाऱ्या वेदना मला सहन करवत नाहींत."

हे त्याचे शब्द ऐकल्यावर त्या ब्राह्मणाच्या बायकोनें आपली भाकरी त्या वाटसरूला देऊं केली. अनेक दिवस उपाशी असल्या-मुळें तिची स्थिति जगते कीं मरते अशी झाली होती. त्यामुळें तिची भाकरी त्या वाटसरूला द्यायाला ब्राह्मण कांकू करूं लागला. पण त्याची बायको म्हणाली, "आपल्या घरीं अतिथी आल्यावर असा स्वार्थी विचार मनांत येऊं देणें, हें ठीक नव्हे. त्या अतिथिला संतुष्ट करणें हें आम्हां गृहस्थाश्रमीयांचें कर्तव्य आहे. शिवाय तुम्ही आपली भाकरी दिलीत. आतां त्याला द्यायला अधिक अन्न तुमच्याजवळ नाहीं. तेव्हां तुमची पत्नी या नात्यानें माझ्या वांट्याचें अन्न त्याला देणें, ही गोष्ट माझ्या पत्नीधर्माच्या दृष्टीनेंसुद्धां उचित आहे."

तिचे हे शब्द ऐकल्यावर ब्राह्मणानें तिची भाकरीही त्या वाटसरूच्या ताटांत वाढली. पण ती दुसरी भाकरी खाऊनही त्याची भूक शमेना. तेव्हां गृहस्थधर्माचें पालन करण्यामध्यें माझ्या पित्याला मी साहाय्य केलें पाहिजे, असें म्हणून त्याच्या मुलानेंहि आपली भाकरी त्या वाटसरूला वाढली. पण अशा रीतीनें तीन भाकऱ्या खाल्ल्या, तरी त्याचें पोट भरेना! अजून भुकेच्या वेद-नांनीं तो विव्हळत होता. अखेरीस त्या ब्राह्मणाच्या सुनेनेंही आपली भाकरी त्याला देऊन टाकली. ही चौथी भाकरी खाल्ल्या-

वर मात्र त्या अतिथीची भूक शमन झाली व त्या सर्वांना तृप्त मनानें आशीर्वाद देऊन तो मग तेथून जायला निघाला.

त्या दिवशीं रात्रीं तीं चारही माणसें भुकेच्या वेदना असह्य होऊन मरण पावलीं !

त्या ब्राह्मणानें आणलेल्या त्या पिठाचे कांहीं कण त्या घरीं जेथें पडले होते, त्या जागीं मी लोळल्यें व मग त्या कणांचा ज्या माझ्या अर्ध्या अंगाला स्पर्श झाला, तेवढ्या अर्ध्या अंगाला तत्काळ सोन्याची कांती प्राप्त झाली. माझें अर्धें अंग सोन्यासारखें चकाकतें आहे, त्याचें कारण हें असें आहे. त्या ब्राह्मणाच्या घरीं हा प्रसंग घडला, त्या दिवसापासून आज किती तरी वर्षें मी या पृथ्वीवरील अनेक ठिकाणीं फिरून त्या ब्राह्मणाकडून घडलेल्या त्या श्रेष्ठ कृत्याच्या तोडीचा यज्ञ दुसऱ्या कुणाकडून घडतो आहे, कीं काय हें पाहात आहें; पण त्या तोडीचा खरा यज्ञ कुठेंही झाल्याचें मला आढळून येत नाहीं. आणि त्यामुळेंच माझ्या या राहिलेल्या अर्ध्या अंगालासुद्धां सोन्याची कांती प्राप्त व्हावी, ही माझी इच्छा आजवर पुरी झालेली नाहीं ! ”

अनुक्रम ०४४२० ... दि ...
क्रमांक ३६०४ ... नोंद दि ...
म. ग्रं. सं. ठाणे; वाचनालय शाखा.
वा. क्र. ३८६० नों. दि ...

# मराठी–भाषा–विहार

— सचित्र —

| | | |
|---|---|---|
| भाग पहिला | किंमत | ०—९—० |
| भाग दुसरा | किंमत | ०—९—० |
| भाग तिसरा | किंमत | ०–१०—० |

लेखक

**गजानन हरि जांबोटकर**

एम्. ए., बी. टी. (मुंबई), टी. डी. (लंडन)

प्रिन्सिपल, बाबू पन्नालाल जैन हायस्कूल, मुंबई

**प्राथमिकः**—पांचवी, सहावी, सातवी

तसेंच

**दुय्यमः**—पहिली, दुसरी, तिसरी

या इयत्तांकरितां अभ्यासक्रमास अनुलक्षून लिहिलेला व्याकरण, शब्दविचार, छंदविचार, अलंकार, पत्रे, अर्ज, आत्मवृत्तें, गोष्टी, निबंध, अनुवाद, सारांश, विस्तार, रसग्रहण, इ. इ. विविध विषयांचा परिचय करून देणारा मराठी भाषेंतील अभिनव भाषा–व्यवसाय.

**वि. सूचनाः**—या पुस्तकांच्या नमुन्यासाठीं प्रती पूर्वींच आपणाकडे पाठविल्या आहेत; त्या आपणांस मिळाल्या नसल्या किंवा हाताशीं नसल्या तर पुनः प्रती पाठविण्याबद्दल निःसंकोचपणें कळवावें. आपलेकडून समजतांच पुस्तकाच्या प्रती लगेच पाठवूं.

## पॉप्युलर बुक डेपो

**लॅमिंग्टन रोड, मुंबई नं. ७**

मुद्रक : **वि. पु. भागवत**, मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, गिरगांव, मुंबई नं. ४
प्रकाशक : **जी. आर. भटकळ**, पॉप्युलर बुक डेपो, लॅमिंग्टन रोड, मुंबई ७